**राज्य सांस्कृतिक धोरण, २०१०**
**"अलंकार व वेशभूषा कोश" या प्रकल्पास मान्यता देणेबाबत.**

# मराठी भाषा विभाग

शासन निर्णय क्रमांक : रासांधो १०१२/ प्र.क्र. ७१/२०१२/ भाषा-३
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २ नोव्हेंबर,२०१२

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्रीय संस्कृतीचे एक वैशिष्टय म्हणजे विविध प्रकारची वेशभूषा हे होय. महाराष्ट्राच्या व महाराष्ट्राबाहेरील विविध भागात विविध प्रकारचे अलंकार तसेच विविध प्रकारची वेशभूषा आढळून येते. डोरली, जोडवी, नथ इत्यादी प्रकारचे अलंकार तसेच विविध प्रकारची वेशभूषा या संदर्भात परिचय करुन देण्याकरिता तसेच समन्वय साधण्याकरिता राज्य शासनाचे महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण, २०१० मध्ये अंतर्भुत करण्यात आल्याप्रमाणे "अलंकार व वेशभूषा कोश प्रकल्प " तयार करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

विचाराअंती या शासन निर्णयान्वये "अलंकार व वेशभूषा कोश" या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता व अलंकार व वेशभूषा कोश या स्वतंत्र कोशांकरीता येणारा प्रत्येकी **रु.२.०० लक्ष (रुपये दोन लक्ष फक्त)** याप्रमाणे **एकूण रु.४.०० लक्ष (रुपये चार लक्ष फक्त)** इतक्या होणाऱ्या खर्चास शासनाची मंजुरी देण्यात येत आहे. सदर प्रकल्प डॉ. वर्षा जोशी, पुणे यांच्याकडे सोपविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अलंकार व वेशभूषा कोशाची निर्मिती करताना सदर प्रकल्पामध्ये प्रामुख्याने खालील बाबी अंतर्भुत करणे आवश्यक आहे .

१) महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील आदिवासी तसेच इतर जातीजमातीतील अलंकार व वेशभूषा यांच्या सांस्कृतिक वैशिष्टयांचा शोध या कोशात घेण्यात येईल.

२) अलंकार व वेशभूषा यांच्या निर्मितीसाठी लागणारी साहित्य त्यावर केली जाणारी प्रक्रिया, त्याची कल्पकता, डिझाईन, त्याच्या निर्मितीचा मूळ स्त्रोत , निर्मितीचा इतिहास याबाबतची सखोल आणि सचित्र माहिती या कोशात असावी.

३) संशोधनाअंती मिळविलेल्या माहितीची सत्यता प्रत्यक्ष संस्थांना भेटी देऊन त्याबाबत पडताळणी करुन, कारागीर, दुकानदार , तज्ञ व्यक्ती यांच्याकडून माहिती गोळा करुन कोश निर्माण करण्यात यावा.

२.	तसेच सदर कोशाची निर्मिती खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे :-

(अ) अलंकार व वेशभूषा कोशाची निर्मिती दीड वर्षाच्या कालमर्यादेत करण्यात यावी.

(ब) सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांनी प्रकल्पांच्या लेखनाबाबत डॉ. वर्षा जोशी यांच्या बरोबर सामंजस्य करार करावा व कराराच्या वेळेस त्यांना नाममात्र मानधन अदा करावे व त्यांच्याकडून जसजसे लेखन मंडळाला प्राप्त होईल त्याप्रमाणे मानधनाची रक्कम त्यांना अदा करण्यात यावी.

(क) अलंकार व वेशभूषा कोशाकरीता करण्यात आलेल्या खर्चाचे विनियोग प्रमाणपत्र शासनास सादर करणे आवश्यक राहील.

३.	यासाठी सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांना याबाबतच्या देयकावर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

४.	सदर प्रकल्पावर होणारा खर्च, मागणी क्रमांक झेडएफ- ०२, २२०५- कला व संस्कृती (०२) (०२) राज्य साहित्य व संस्कृती मंडळ , योजनांतर्गत योजना - ३१ - सहायक अनुदाने (वेतनेतर) (२२०५ ३२१४)" या लेखाशिर्षाखाली संबंधित वित्तीय वर्षात उपलब्ध करुन दिलेल्या मंजूर तरतूदीतून व मासिक निधी विवरणपत्राप्रमाणे भागविण्यात यावा.

५.	हा शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. १७/१४४३ दि. ८ ऑगस्ट, २०१२ व वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. ५६५/१२/व्यय - ४, दि. १७ ऑगस्ट २०१२ अन्वये प्राप्त झालेल्या मंजुरीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(संगणक संकेतांक क्र. २०१२१२१०१६५२४५००३३)

**(सुरेश अ.पेडगावकर)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति ,

१. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
२. सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
३. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परिक्षा / लेखा अनुज्ञेयता), मुंबई,
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
५. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
६. महालेखाकार (स्थानिक निकाय लेखापरिक्षा व लेखा) , महाराष्ट्र , मुंबई
७. वित्त विभाग (व्यय ४/सेवा ५/विनियम) , मंत्रालय, मुंबई,
८. निवड नस्ती